नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १९/०१/२०२६ (सोमवार )

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद, २ आरोपी अटक, २ वाहनांसह ९० लाख ९५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त,मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक १९/०१/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी टोल नाका माथनी येथे नाकाबंदी केली असता वाहन क्रं १) ट्रक क्र. एम एच ४०बि. एफ ९९१० आणि वाहन क्रं २) ट्रक क्र. एम एच ४०सी टी ९३०० मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **दोन्ही चालकांना विचारपुस केली असता वाहन क्रं १) चा चालक अमित नरेश बागडे, वय ३२ वर्ष, रा. फुलमोगरा ता. जि. भंडारा तसेच वाहन क्रं २) चा चालक सुमीत लक्ष्मण मेश्राम, वय २६ वर्ष, रा. नाथ नगर मौदा ता. मौदा अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** पोलीसांनी आरोपीतांना रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहिती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद दोन्ही वाहने किमती ९०,००,०००/—रूपये आणि वाहन क्रं १ आणि २ मधुन एकुण १९ ब्रास रेती किंमती ९५,०००/— रूपये असा एकुण ९०,९५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे मौदा येथे कलम ३०३ (२), ४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ **अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**




## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्रीसाठी वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद, आरोपी अटक
## पोलीस स्टेशन केळवद यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद**:— दिनांक १८/०१/२०२६ रोजी केळवद पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, खाजगी बसने अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन केळवद हद्दीतील जुना केळवद बस स्टॉप येथे नाकाबंदी केली नाकाबंदी दरम्यान खाजगी बस हे वाहन मिळुन आले. नमुद वाहनाच्या डिक्कीतील बॅग ची तपासणी केली असता दोन बॅग मध्ये प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. नमुद बॅग बाबत

विचारपुस केली असता एका महीलेने सांगितले की, तिचे पती **आरोपी नामे मनोज शंकरराव जोशी, वय ५५ वर्ष, ह.मु. वार्ड नं. १५, सौंसर, जि. पांढुर्णा, मध्यप्रदेश, स्थायी पत्ता. रा. शांतीनगर, मारवाडी वाडा, जैन मंदिर समोर, नागपुर, जि.नागपुर यांनी या बॅग ठेवल्या आहे. नमुद आरोपीला ताब्यात घेवुन त्यांची चौकशी केली त्यानेच नागपुर येथे नेवुन विक्री करण्यासाठी अवैधरित्या खाजगी बस मध्ये प्रतिबंधीत सुगंधी तंबाखु ठेवला असल्याची माहीती प्राप्त झाली.**

**पोलीसांनी पंचासमक्ष सुगंधित तंबाखुचा एकुण ७.३७६ किलो प्रतिबंधित साठा किंमती १३,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे केळवद येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

## कुही पोलीस स्टेशन हद्दीतील अवैधरीत्या विनापरवाना रेती चोरी करणाऱ्या तसेच अवैधरीत्या दारू विक्री करणाऱ्या सराईत गुन्हेगार अशा २ गुन्हेगारांना यांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**पोलीस स्टेशन कुही हदद्दीतील अवैधरीत्या विनापरवाना रेती चोरी करणाऱ्या तसेच अवैध दारू व्यवसायात सक्रिय आरोपीस यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, उमरेड यांनी हद्दपार केले.**

सराईत गुन्हेगार नामे १) तुषार बारसु नेवारे, वय २५ वर्ष, रा. सुरगाव ता. उमरेड, जि. नागपुर याचेवर अवैध रित्या विनापरवाना रेती चोरीचे गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवयीचा असुन तो असे गुन्हे करून शासनाचा महसुल बुडवतो. तसेच आरोपी क्रं २) महिला आरोपी हिचेवर अवैधरीत्या दारू खरेदी विक्रीचे गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसारातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. पोलीसांनी आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी पोलीसांनी त्यांचेवर प्रतिबंधक

कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे गुन्हेगार १) तुषार बारसु नेवारे, वय २५ वर्ष, रा. सुरगाव ता. उमरेड, जि. नागपुर २) महिला आरोपी यांचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव कुही पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, उमरेड यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी यांना **३ महीन्यांकरीता** नागपुर ग्रामीण व जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हा नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



हद्‌दपार आरोपी तुषार बारसु नेवारे

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने